
आई,झाला अभ्यास खेळायला जाऊ?
थांब मी बघते काय अभ्यास केलाय ते.
मग अजून दहा मिनिटांनी ये...
...म्हणजे दाखवण्याइतपत झाला असेल.
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर



काय चिंटू, चहा पितोस का ?
हो. पितो ना, जोशीकाकू.
अरे, लहान मुलांनी चहा पिऊ नये, दूध प्यावं.
बरं, मग दूधही चालेल !
ते अवेळी पिऊ नये ! गॅसेस होतात !
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू, कॅच घे!
एवढ्या मोठ्यांदा ओरडायची काही गरज होती का?
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर



© 2002


चिंटू, केला का पप्पांनी गळणारा नळ दुरुस्त ?
अजून त्यांना तो नळच काढायला जमत नाहीये !
जमला ! जमला !!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


जोशीकाकू काहीतरी छान पदार्थ करताहेत. तू आधी जा...
...आणि तुला आवडला तर मला येऊन सांग.
© 2002 चाणक्य पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू, यातला तुझा मोडका खेळ टाकून देऊया का?
मग मला खेळायला खेळणंच उरणार नाही!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर



गोऽऽऽल
चिंटू, आज परत तू गोल केलास वाटतं..!
© 2002


चिंटू, मी एक गोष्ट लिहिलीय. तू वाच आणि सांग कशी वाटतेय ते.
वाचली. मी थोडे बदल केलेत. पण आता मस्त झालीय, बगळ्या.
काय काय बदललंयस?
थोडी सुरुवात बदललीय, थोडा शेवट बदललाय आणि थोडं मधे मधे बदललंय!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


माझे उगाचच जास्त लाड कोण करतं यावरून आज आई-पप्पात भांडण झालं.
मला फार वाईट वाटतंय.
आपल्यावरून भांडण झालं म्हणून ना?
नाही. आता पुढील काही दिवस दोघेही माझे कमी लाड करतील.
© 2002


चिंटू, तू खरं सांगितलंस तर मी तुला सोडून द्यायचा विचार करेन. काल तू मला 'मठ्ठ' म्हणालास ना?
हो.
राजू 'विचार करेल' यावर तुझा विश्वास कसा बसला?
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू, आज राजूशी भांडू नकोस. त्याचा मूड खराब आहे.
माहिताय मला.
कसं काय ?
माझ्यामुळेच त्याचा मूड खराब झाला ना!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर



चिंटू, किती बरबटलायस चिखलात!
अगं,राजू चिखलात पडला म्हणून बगळ्या हसला...
तर त्यानं बगळ्यालाही चिखलात पाडलं.
म्हणून मी हसलो तर दोघांनी मला पाडलं.
मग मिनी, पप्पू , नेहा सगळेच चिखलात खेळायला आले !
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू, पप्पांना सांग, 'चहा ठेवलाय.'
चिंटू, आईला सांग, 'चहा नकोय.'
आता तरी त्यांना एकमेकांशी बोलायला लागेल.
कोणाला जेवायचं असेल, तर स्वयंपाक तयार आहे.
'मला भूक आहे', असं मी.. कोणालाही बोललो नव्हतो.
त्यांचं भांडणात कोणावाचूनही अडत नाही.
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


जा बंटी, बॉल आण.
इथे बघ.
तिथे बघूया.
इथे बघ.
बघ, किती हुशार आहे! बरोब्बर बॉल शोधून काढला!
© 2002 प्रभाकर पंडित प्रभाकर वाडेकर


चिंटू, चूक तुझी आहे. वाटल्यास राजूला विचारू.
नको, पप्पूला विचारू.
चालेल. पप्पू कुठाय?
तो गावाला गेलाय!
© 2002


...आणि तुझ्यासाठी एक कटलेट.
थांबा थांबा. मला ऑर्डर बदलायचीय.
कितीदा बदलतोयस!
काय करणार? आसपासचे लोक वेगवेगळे चांगले पदार्थ मागवताहेत!
© 2002



लवकरच दिवाळीची सुट्टी!
पण त्या आधी परीक्षा!
मिने, तुला सुट्टी आवडते का परीक्षा?
परीक्षा!
मला उत्तर माहीत असूनही मी हा प्रश्न का विचारला?
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू, मी तुला माझी पावसावरची कविता वाचून दाखवू?
ऑ! ऐकली ना एकदा!
नाही. त्यावेळी पाऊस नव्हता म्हणून तू ऐकली नव्हतीस.
अरेच्या! खरंच की!
पण वर्तमानपत्रात आलंय सरासरीएवढा पाऊस अजून झाला नाहीये.
(c) 2002


सोनू, तुला सुट्टी आवडते का शाळा ?
शाळा !
माझंच चुकलं ! तो अजून शाळेत जात नाही ना !
© 2002 चंद्रहास पंडित / प्रभाकर वाडेकर



पप्पू ,आज मी शाळेत येणार नाहीये.
काय झालं ?
अंग दुखतंय. बरं वाटत नाहीये. थोड्या शिंकाही आल्या.
उरलेलं दोन्ही ठीक आहे... पण तू शिंका कशा आणल्यास ?
© 2002


बगळ्या, तुला शाळा आवडते का सुट्टी?
तुला काय आवडतं?
मी आधी विचारलंय.
तू आधी सांगितलंस तरच मी उत्तर देईन!
तुला इतकं सोप्पं उत्तर येत नसेल तर अवघड आहे!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


आई, इथली माझी गणिताची वही पाहिलीस ?
अभ्यासाला बसतोयस ?
हो.
थांब. मग मीच शोधून देते.
आता खरंच अभ्यासाला बसावं लागणार.
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर



ऑ! चिंटू , तुला न आवडणारी भाजी सगळी संपवलीस ?
आज फारच मस्त झाली होती.
आज काय काय बरं घातलं होतं भाजीत ?
मला कधी कधी तिची गंमत करावीशी वाटते.
© 2002



चिंटू आहे का ?
नाहीये.
अरेच्या, आत्ता तर मी त्याला पाहिला.
पण त्यानंही तुला पाहिलं ना !
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू, पप्पांना जेवायला बोलाव.
ते शांत झोपलेत!
झोपलेत? आत्ता तर येऊन 'कसली भाजी आहे' ते पाहून गेले.
म्हणूनच झोपले असतील कदाचित्!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर



पप्पांनी आईला साडी घेतली. आई खूष आहे.
का? आईला साडी आवडली?
नाही. आईला त्याच दुकानातली दुसरी साडी आवडली होती.
त्यामुळे ती लगेच बदलून आणायला गेलीय.
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


मला श्रावण फार आवडतो.
कधी पाऊस कधी ऊन. सगळीकडे हिरवंगार, आकाशात इंद्रधनुष्य असतं म्हणून ना ?
नाही. श्रावणात शाळेला सुट्या जास्त मिळतात म्हणून.
दर श्रावणात तू हेच सांगतोस.
मला आशा आहे, एखादवेळेस तरी तू निसर्ग आवडतो असं म्हणशील.
© 2002



चिंटू, फ्रिजमध्ये गोल पातेल्यात जेली सेट करायला ठेवली होती. जा आण.
बाप रे, ती जेली होती?
मी सरबत म्हणून केव्हाच पिऊन टाकलीय!
© 2002


© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


बगळ्या, क्रिकेट खेळायला येतोस ?
मला पहिल्यांदा बॅटिंग द्याल ?
का पण ?
मग..!
नंतर मला आईनं केलेले गरम बटाटेवडे खायला जायचंय!


चिंटू, तू नक्की भोंडल्याला ये. खिरापत मस्त आहे!
काय आहे ते आधी सांग, मिने. मी कोणालाही सांगणार नाही.
ही खिरापत असेल तर मी येईन.
मी पण येईन.
मी पण येईन.
© 2002



थांब सोनू, मी मदत करतो तुला धरण बांधायला.
आम्ही पण येतो सोनूला मदत करायला.
मी येऊ मदतीला?
ते सगळे मला मदत करताहेत.
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


© 2002



चिंटू, बाहेर ऊन खूप आहे. टोपी घालून जा!
माझी सापडत नाहीये.
मग पप्पांची घाल!
बसतेय का पप्पांची टोपी?
तेच बघतोय आरशात...
पण कळत नाहीये!
©2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


माझं पोट ठीक नाहीये.
काय खाल्लंस?
भेळ, बिस्किटं, दूध आणि थोडे शेंगदाणे. वर पाणी प्यायलो.
हो ना...
सध्या पाणीच खराब आहे!
© 2002


बगळ्याकडच्या आरतीला जाऊन आलो. माझ्याकडचीही झाली.
आता माझ्या घरी!
आता माझ्या घरच्या आरतीनंतर नेहा आणि राजूकडे जाऊ आरतीला.
गुळण्या कर गरम पाण्यानं, म्हणजे सुटेल बसलेला घसा!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू, पप्पू, काय खेळताय?
आम्ही खेळत नाहीयोत. आम्ही सैनिक आहोत!
चिंटूच्या घराचं चोरापासून रक्षण करतोय.
अय्या, पण चोर कुठेयत?
आम्हाला बघून येतच नाहीयेत!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू, आज दसरा. तुझी सायकल धू. सायकलला झेंडूच्या फुलांचा हार घाल.
पप्पा, धुतली सायकल. घातला हार. आता काय करू ?
आता परत आंघोळ कर.
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


आई, मला अभ्यासाला मदत करशील ?
हो ऽऽ. काय करू ?
थोड्यावेळानं मला अभ्यासाला बसायची आठवण कर.
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


गुईई ऽऽ
बंटीला मी चांगली राखण करणारा कुत्रा कसं बनायचं ते शिकवतोय.
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू, मी दोन दिवस ऑफिसच्या कामासाठी गावाला जातोय.
नीट वाग. आता तू मोठा झालायस.
म्हणजे काय करू पप्पा?
काही नाही मी सांगेन तसं वागायचं!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर



आई, मी तुझा शांपू घेऊ?
घे.
अगदी थोडा घ्यायचा असतो हं!
तू सांगायला उशीर केलास!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


मी कधी कधी विचार करतो...
काय?
की मी राजूची टिंगल का करतो ?
तू हा विचार करतोस, हे चांगलंच आहे.
फक्त दर वेळी मार खाल्ल्यावर हा विचार करतोस !
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू, तू माझं पुस्तक परत देणार होतास.
हो.
विसरलास काय ?
नाही.
ते कोणाला दिलंय ते विसरलोय!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


बाप रे, रक्त येतंय.
बिच्चारा चिंटू
रडू नकोस हं चिंटू.
अरे असू दे...
मी काही रड्या नाहीये. एवढ्याशा लागण्यानं मी काही रडत नाही.
आई ते औषध नको. झोंबेल.
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू-पप्पू, तुम्ही माझ्याकडे खेळायला येता?
आपलं खेळणं झाल्यावर माझी आई मस्त खाऊ देईल!
आम्ही डायरेक्ट खाऊच्या वेळेला आलो तर चालेल का?
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


मी फार छान कविता केलीय.
कशावरून छान?
बगळ्याच म्हणाला तसं!
मग दाखव वाचून.
बगळ्या, ज्या गोष्टी कळत नाहीत त्याबद्दल यापुढे मत देत जाऊ नकोस.
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू, मी तुला सिक्स कशी मारायची ते शिकवतो.
पुढच्यावेळी फक्त ग्राउंडवरच अशी सिक्सर मार.
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर



पप्पा, मी हे सेंटेड खोडरबर घेऊ?
कितीला आहे ते?
आठ रुपये.
बाप रे! आठ रुपये?
घ्या ना. वाटल्यास मी ते वापरणार नाही.
© 2002


बन्या?
हो.
कमाल आहे! आपण शाळा संपल्यानंतर आज भेटतोय. तरी ओळखलंस?
मग..!
... मी चेहरे विसरत नाही!
XEROX
STD
ISD
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर



आऽक...
...छी!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


पप्पा,आज माझ्यामुळे आमच्या टीमनं क्रिकेटची मॅच जिंकली.
अरे वा! तू रन्स काढल्यास,का विकेट घेतल्यास?
नाही.आज मी अंपायर होतो!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू,हा कोथिंबिरीच्या वड्यांचा डबा जोशीकाकूंना नेऊन दे.
वाटेत उघडू नकोस.
दिलास ?
नाही.वाटेतूनच परत आणला.
तू वड्यात मीठ घालायला विसरलीयस.
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


काय रे पोरांनो, नाडकर्णीकडे असंच जायचं ना?
हात खाली करून गेलात तरी चालेल.



कसला तास आहे ?
गणिताचा.
मुलांनो, आज आपण खेळ खेळू...
धमाल
हुर्रे
हे ऽऽ
.. गणिताचे खेळ !


चिंटू, पुड्यातील सगळी अठराच्या अठरा बिस्किटं खाल्लीस ?
नाही.
पप्पा म्हणाले, मला पण दे.
मग ?
त्यांना पण दोन दिली!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


आई, चहात बुडवून बिस्किटं खातो. मला चहा दे ना.
देते.
अजून दोन बिस्किटं दे.
अरे, किती बिस्किटं खातोस ?
त्यातली बरीचशी खाण्याआधी चहातच पडली !
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


चिंटू, येतोस सोनाराकडे ?
सतीशदादा, सोनाराकडे ?
ही रिंग काढून घ्यायचीय...
वा! बरं झालं. हे कानात रिंग वगैरे अगदी बेकार दिसतं.
... आणि ही रिंग घालायचीय.
© 2002


मी माझ्या आईनं सांगितलेली सर्व कामं करतो.
मी पण!
उगाच थापा मारू नकोस.
तू माझ्या आईला काही मदत केल्याचं मी कधीही पाहिलं नाहीये!
© 2002 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर